**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २०/२०१६-१७/१५५ दिनांक: ०६-१०-२०१६

**आदेश**

**आदेश केस क्र. २०/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. यशवंत विठ्ठल सोलनकर :<br>मु. पो. तिकोंडी<br>ता. जत, जिल्हा. सांगली | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली. | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग संख | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

१) श्री यशवंत विठ्ठल सोलनकर रा. तिकोडी ता. जत. जि. सांगली यांनी त्यांच्या गट क्र.१८० मध्ये शेती पंपासाठी नवीन वीज जोडणी मिळणेसाठी वि.प. कडे अर्ज करुन दिनांक १६-०९-२०१५ रौजी रु.६१००/- भरणा केले. प्रचलीत नियम व कायद्यानुसार तक्रारदार यांना तीन महिन्यात वीज जोडणी मिळणे आवश्यक होते. परंतु त्यांना वीज जोडणी न मिळाल्यामुळे त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दिनांक २५-०५-२०१६ रोजी गा-हाणे दाखल केले. दिनांक २७-०७-२०१६ रोजी सदर कक्षाने तक्रारदार यांना जेष्ठता यादीप्रमाणे विद्युत पुरवठा करणेत येईल असा आदेश केला. त्यावर नाराज होऊन सदर अपिल तक्रारदार यांनी या मंचाकडे दाखल केले आहे. तक्रारदार यांनी त्यांना निश्चित कालावधीत विद्युत पुरवठा मंजूर करुन झालेल्या विलंबाबत प्रत्येक आठवडयास शंभर रुपये प्रमाणे भरपाईची मागणी त्यांच्या तक्रार अर्जात केलेली आहे.

२) वि.प. तर्फे लेखी निवेदन दाखल करणेत आले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, तक्रारदार यांना वीज जोडणी देणेसाठी ०.२४ कि.मी. लघु दाब विद्युत वाहिनीची उभारणी करावी लागणार आहे. त्यांचे पुढे असेही म्हणणे आहे की, तक्रारदार यांचा प्रतिक्षादीत २५० वा क्रमांक आहे. प्रतिक्षा यादीप्रमाणे तक्रारदार यांना वीज जोडणी देणेत येंईल असे वि.प. यांचे म्हणणे आहे.

३) या प्रकरणाची सुनावणी दि. ०५-१०-२०१६ रोजी घेणेत आली. त्यावेळी तक्रारदारतर्फे श्री हरिभाऊ खापरे हे प्रतिनिधी हजर होते. वि.प.तर्फे कार्यकारी अभियंता श्री दराडे व कनिष्ठ अभियंता श्री महेश शेंडे हजर होते. या सर्वाचा तोंडी युक्तिवाद ऐकणेत आला. उपलब्ध सर्व कागदपत्रांचे वाचन करणेत आले आहे.

४) श्री खापरे यांनी कृतिमानके विनियमाप्रमाणे वीज जोडणी मिळावी अशी विनंती केली. कृति मानके प्रमाणे ऊद्दीष्टे साध्ये करण्यास अडचणी येत असतील तर त्यासाठी केवळ विद्युत नियामक आयोगाकडे दाद मागून अडचणीचे निवारण करता येईल असे त्यांचे म्हणणे आहे.

वि.प. तर्फे असे कथन आहे की, प्रथम येणा-यास प्रथम पुरवठा या तत्वानुसार वीज जोडण्या देणेत येतात व त्यामुळे तक्रारदार यांना वीज जोडणी दिल्यास त्यांच्या अर्जापूर्वी अर्ज करणा-या सर्व शेतक-यांवर अन्याय होईल.

५) या मंचाचे निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

(१) तक्रारदार यांची वीज जोडणी मिळणेबद्दलची विनंती मान्य करता येण्यासारखी आहे काय?
उत्तरः- होय.
(२) कोणता अंतिम आदेश?
उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

६) तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे यांनी स्पष्टपणे, विलंबाबाबत प्रति आठवडा रु. १००/- भरपाई मिळणेची केलेली मागणी या मंचासमोर सुनावणीचे वेळी सोडून दिलेली आहे. त्यामुळे त्या बाबीचा विचार करणेची गरज नाही.

७) तक्रारदार यांनी नविन वीज जोडणीचा अर्ज वि.पं.कडे करुन दि. १६-०९-२०१५ रोजी रक्कम रु.६१००/- भरणा केली याबाबत वाद नाही. संबंधित परिक्षेत्रात सन-२०११-१२ पासूनचे शेती पंपासाठी वीज जोडणी मिळणेबद्दलचे शेतक-यांचे अर्ज प्रलंबित आहेत. तक्रारदार यांचा प्रतिक्षा यादीतील क्रमांक २५० असा आहे याबद्दलही फारसावाद नाही.

८) तथापि कृतिमानके विनियम २०१४ मधील तरतूदीनुसार तक्रारदार यांना तीन महिन्यात वीज जोडणी मिळाली नाही हे स्पष्ट आहे. सदर विनियमातील तरतूदीमध्ये बदल, दुरुस्ती वगैरे करण्याचे अधिकार नियम १४.१ नुसार फक्त विद्युत नियामक आयोगाला आहेत. तसेच कृतिमानके विनियमातील तरतूदी अंमलात आणताना कोणतीही अडचण येत असेल तर त्यांचे निवारण करण्याचे अधिकार सुध्दा मा. आयोगास नियम १५.१ नुसार दिले आहेत.

९) या मंचाचे असे मत आहे की, तक्रारदार हे निश्चित व विशिष्ट कालावधीत वीज जोडणी मिळणेस पात्र आहेत. फक्त त्यांच्या अर्जात कोणतीही त्रुटी नसावी आणि त्यांचाअर्ज सर्व दृष्टीने परिपूर्ण असावा. तक्रारदारतर्फे तक्रारअर्जातील भरपाईची मागणी स्वखुषीने सोडून देणेत आली आहे हे वर नमूद केले आहेच. सबब आमच्या विचारे प्रस्तुतचा तक्रार अर्ज अंशतः मंजूर करणे योग्य होईल. त्यामुळे खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

## आदेश

१) तक्रारदार यांच्या नविन वीज जोडणी मिळणेच्या अर्जाची सर्व दृष्टीने पूर्तता झाली असल्यास (अगर झाल्यानंतर ) त्यांना जानेवारी २०१७ अखेर मागणी प्रमाणे कृषि पंपासाठी नविन वीज कनेक्शन देणेत यावे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |